# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३५८/२०२४ दिनांक २८/०९/२०२४

## प्रेस नोट

**" बुरखा परिधान करुण रात्रीच्यावेळी हॉस्पीटलमध्ये येवुन चोरी करणा-या आरोपीतास जिल्हा कटिहार, राज्य बिहार येथुन अटक करुण त्याच्याकडुन १८,००,०००/ रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात काशीगांव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश."**

दि.२१.०९.२०२४ रोजी फिर्यादी नामे डॉ. कपिल प्रमोदकुमार शुक्ला, वय ३४ वर्षे, रा. रुम नं. ए/६०२, जे.पी. डेक्स, गोकुळधाम सोसायटीच्या बाजूला, गोरेगाव पुर्व, मुंबई यांनी तक्रार दिली की, दिनांक २०.०९.२०२४ रोजी ते त्यांच्या राधा हॉस्पीटल, विनय नगर येथे नेहमी प्रमाणे पेशंट चेक करण्या करीता गेले असता त्यांना त्यांच्या कॅबिनमध्ये टेबलचे ड्रावर व लाकडी कपाट तुटलेले दिसले त्यावेळी त्यांनी ड्रावर व कपटामध्ये ठेवलेले एकुण २१,००,०००/रु. रोख रक्कम (अक्षरी-एकविस लाख रुपये) इतकी रक्कम मिळुन आली नाही. त्यावेळी त्यांनी त्यांच्या कॅबिनमधील सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता रात्रीच्यावेळी एक अनोळखी इसम काळ्यारंगाचा बुरखा परिधान करुण आत हॉस्पीटलमध्ये येवुन चोरी करत असल्याचे दिसुन आले तेव्हा तक्रारदार यांची खात्री झाली की, ते रात्री त्यांच्या राहत्या घरी असतांना कोणीतरी अनोळखी इसमाने बुरखा परिधान करुण हॉस्पीटलमध्ये येवून घरफोडी करुण २१,००,०००/ रु. रक्कमेची चोरी केली आहे. म्हणून तक्रारदार यांच्या तक्रारीवरुण काशिगाव पोलीस स्टेशन येथे गु.रं.नं ३०२/२०२४ भा. न्या.सं.कलम ३३१ (४), ३०५ प्रमाणे अनोळखी इसमा विरुध्द चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

नमुद दाखल गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देवून दाखल गुन्हा उघड करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे काशिगांव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे बारकावे तपासुन नमुद गुन्हा हा हॉस्पीटलची माहीती असलेल्या इसमाने केला असल्याचा सुगावा मिळाला त्या अनुषंगाने गुन्ह्याचा तपास केला असता हॉस्पीलटमध्ये पुर्वी काम करत असलेला इसम नामे मनिषकुमार जयश्याम मिश्रा यांस प्रतापगड, राज्य उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेतले त्यास पोलीस स्टेशनला आणुन त्याच्याकडे केलेल्या चौकशीत व मोबाईल तांत्रिक विश्लेषणाच्या कौशल्यातुन त्यांच्याकडे चालक म्हणून काम करणारा त्यांचा चालक सोनु अल्लाउद्दुन शेख याने सदर गुन्हा केला असल्याचे दिसुन आले असता इमस नामे सोनु अल्लाउद्दुन शेख यांस सिंहीगांव, जिल्हा कटीहार, राज्य बिहार येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे केलेल्या तपासात नमुद गुन्हा त्यांनी फौजदारीपात्र कट करुण केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद गुन्ह्यात आरोपी नामे १) मनिषकुमार जयश्याम मिश्रा, पत्ता प्रतापगड, राज्य उत्तर प्रदेश २) विरेंद्र भारत पुरी वय ३४ वर्षे रा. हनुमान चाळ, घोडबंदर शिफ्टींग, काशिगाव मिरारोड (पु) ता.जि. ठाणे मुळ पत्ता- प्रतापगड, राज्य उत्तर प्रदेश ३) सोनु अल्लाउद्दुन शेख, वय २८ वर्षे, पत्ता- सिंहीगांव, जिल्हा कटीहार, राज्य बिहार यांना दिनांक २४.०९.२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन अटक आरोपीतांकडुन नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांच्या हॉस्पीटलमधुन चोरी केलेल्या रक्कमे पैकी एकुण १८,००,०००/रु रोख रक्कम (अक्षरी- अठरा लाख रुपये) तसेच

गुन्ह्यात वापरलेली ऑटो रिक्षा, आरोपीताने परिधान केलेला बुरका व घरफोडीचे साहित्य इत्यादी त्यांच्याकडुन हस्तगत करण्यात आले आहे. अटक आरोपी हे दिनांक २९.०९.२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांडमध्ये असुन नमुद गुन्ह्याचा तपास पोलीस उप निरीक्षक अभिजीत लांडे, किरण बगडाणे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिगाव पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगाव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

-----ooo-----